# कृषी विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका रत्नागिरी ४१५ ६१२.
दूरध्वनी क्र.- ०२३५२-२२४६२७ ई मेल - adortn296@gmail.com / adortn@rediffmail.com

जा.क्र. रजिप/कृषी/ कार्या-२/ २१६ /२०२३ दिनांक ०३.०२.२०२३

वाचले : १) रत्नागिरी जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा दिनांक ०५.१२.२०२२ रोजीचा ठराव क्र. २५
२) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना जा.क्र. विप्र-७/ डॉ.बाआंकृस्वायो/तां.मा.सू/ १९९४३ /२०२२ दिनांक ०२.०६.२०२२
३) महाडीबीटी पोर्टलवरील ऑनलाईन लॉटरीद्वारे निवडलेली लाभार्थी यादी.
४) जिल्हास्तरीय निवड समिती सभा दिनांक १०.१०.२०२२ व ०२.०२.२०२३
५) महाडीबीटी पोर्टलवर कृषी अधिकारी (विघयो) यांनी अपलोड केलेली अंदाजपत्रके.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२२ - २३ मधून अ. जा. प्रवर्गातील शेतक-यांना नवीन सिंचन विहीरींचा लाभ चा तांत्रिक मंजूरी आदेश देणेबाबत...**

उपरोक्त वाचले क्र. ०१ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २०२२-२३ ला प्रशासकीय मंजूरी मिळाली आहे. तसेच उपरोक्त वाचले क्र. ०२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आल्या आहेत. त्यास अनुसरुन उपरोक्त वाचले क्र. ०३ अन्वये प्राप्त झालेल्या खालील लाभार्थ्यांच्या निवडयादीला उपरोक्त वाचले क्र. ०४ अन्वये जिल्हा निवड समितीने दिनांक १०.१०.२०२२ व ०२.०२.२०२३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त वाचले क्र. ०५ अन्वये, कृषी अधिकारी (विघयो), पंचायत समिती यांनी, या कार्यालयास सादर केलेल्या प्रत्येक अंदाजपत्रकांना खालील अटी व शर्तीना अधीन राहून याद्वारे तांत्रिक मंजूरी देणेत येत आहे.

| अ.क्र | तालुका | गाव | लाभार्थ्याचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | तांत्रिक मंजूरीची रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिपळूण | मिरवणे | श्री. अनिल तुळशीराम मोहिते | ३४११९०/- | २५००००/- |
| २ | | कळवंडे | श्री. मंगेश शांताराम जाधव | ३४११९०/- | २५००००/- |
| ३ | लांजा | इंदवटी | श्रीम. अर्पणा रामचंद्र जाधव | ३१५४२८/- | २५००००/- |
| ४ | | हसोळ | श्री. सदानंद कृष्णा कांबळे | ३१५४२८/- | २५००००/- |
| ५ | | गवाणे | श्रीम. सरिता सिद्धार्थ कांबळे | ३१५४२८/- | २५००००/- |
| ६ | | कोंड्ये | श्री. विलास लक्ष्मण कांबळे | ३१५४२८/- | २५००००/- |
| ७ | | देवधे | श्री. सोमा रोंगा कांबळे | ३१५४२८/- | २५००००/- |
| ८ | | कुर्णे | श्री. महेंद्र जानू कांबळे | ३१५४२८/- | २५००००/- |

अटी व शर्ती :-

१. या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे लाभार्थ्यांस बंधनकारक राहील.
२. ज्या सर्व्हे क्रमांकामध्ये नवीन सिंचन विहीर मंजूर झाली आहे तेथेच काम करणे बंधनकारक राहील. अन्यथा नवीन विहीरीचे अनुदान आदा केले जाणार नाही.
३. कृषी अधिकारी (विघयो) पं. स. यांनी कामाचे लाईनआऊट दिलेनंतर एका महिन्याच्या आत नवीन सिंचन विहीरीचे खोदकाम सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर विहीर रदद करणेचा अधिकार जिल्हा स्तरीय निवड समितीस राहील.
४. प्रस्तावित विहीरीपासून इतर विहीरींचे अंतर ५०० फूटांपेक्षा जास्त असावे.
५. नवीन विहीरीचे काम हे अंदाजपत्रकानुसार पूर्ण करणे बंधनकारक राहील.
६. नवीन विहीरीचे खोदकाम पूर्ण झालेनंतर बांधकाम करणे अनिवार्य आहे अन्यथा आपली विहीर अपूर्ण समजणेत येऊन उर्वरीत मंजूर अनुदान दिले जाणार नाही.
७. नवीन सिंचन विहीरीचे खोदकाम करताना मजूरांच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील.
८. सिंचन विहीरीसाठी उच्चतम अनुदान मर्यादा र. रु. २.५० लाख आहे. जादा होणारा खर्च लाभार्थ्यास करावा लागेल.
९. महाडीबीटी पोर्टलवरुन वारंवार प्राप्त होणा-या सूचनांचे पालन करणे लाभार्थ्यास बंधनकारक राहील.
१०. अनुदान वितरण हे आधार संलग्न बँन्क खात्यात वर्ग करणेत येईल. त्यासाठी लाभार्थ्याने महाडीबीटी पोर्टलवर आधार प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या **https://www.zpratnagiri.org/** या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०२३०२२८९१०८२** असा आहे.

कृषी विकास अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती व कृषी अधिकारी (विघयो) .......................... यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी.

Scanned with CamScanner